**विशेष दिवाणी दावा क्र. १२९/२०११**

**CNR No. MHSO060004602011**

कमलाकर साळुंखे (मयत) वारस वगैरे

वि.

बाबुराव जवळेकर वगैरे

## आदेश निशाणी क्र. १५६ वर

०१. मा. न्यायदंडाधिकारी, वर्ग–१, पंढरपूर यांच्या न्यायालयातून प्राप्त झालेली दिनांक १६/१२/२००१ च्या साठेखताची प्रमाणित प्रत सोबतच्या यादीप्रमाणे दाखल करण्यास वादी यांनी परवानगी मागितलेली आहे.

०२. त्यावर तीव्र आक्षेप प्रतिवादी यांनी नोंदवला आहे. सदर दस्त हा साठेखताचा मुळ दस्त नाही. प्रस्तुत प्रत दाखल करण्यासाठी वादी यांनी दिनांक ०५/०३/२०१२ रोजी अर्ज दिला होता. न्यायालयात त्याची प्रमाणित प्रत दिनांक १४/०३/२०१२ रोजी तयार झालेली आहे. तर वादी यांनी सुमारे ८ वर्ष सदर दस्त प्रकरणात दाखल का केला नाही याचे कारण नमूद केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुत संशयास्पद दस्त दाखल करण्यास परवानगी देऊ नये असे त्यांनी नमूद केले.

०३ प्रस्तुत साठेखताच्या दस्ताची प्रमाणित प्रत च्या वैधतेबाबत प्रश्न उलटतपासणी तसेच युक्तिवादाच्या वेळी प्रतिवादी यांना मांडता येतील. जर सदर कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी दिली तर प्रतिवादी यांचे नुकसान होणार नाही. प्रकरणाच्या योग्य न्यायनिर्णयासाठी प्रस्तुत अर्ज मंजूर करणे योग्य राहील. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२.	सोबतच्या यादीप्रमाणे कागदपत्र दाखल करण्यास वादी यांना परवानगी देण्यात येत आहे.

स्वाक्षरी/-

दि. १३/१०/२०२१

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed<br>by the P. O. on | : | 13/10/2021 |
| Order uploaded on | : | 14/10/2021 |